# अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
कार्यालय, पाषाण रोड, चव्हाणनगर, पुणे - ४११ ००८.

दुरध्वनी क्र. (०२०)२५६३८४४७ फॅक्स (०२०) २५६३८४४३
ई मेल - SP.cid.adm@mahapolice.gov.in वेबसाईट :- www.mahacid.gov.in


क्रमांक : अपोमसं/गुअवि/आस्था-३/अति.मुशादप/शादप/ पदो.२४-२५/२०२५/3012 पुणे, दि. /०५/२०२५
13 0 MAY 2025

विषय :- पदोन्नतीने नेमणुकीबाबत.

*****

आदेश :-

अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.राज्य, पुणे यांचे अधिनस्त कार्यरत असलेल्या हस्ताक्षर व छायाचित्रण विभागातील खालील नमूद शासकीय दस्तऐवज परिक्षक यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नवीन नियुक्तीच्या ठिकाणी त्यांनी कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून अति.मुख्य शासकीय दस्तऐवज परिक्षक वेतनस्तर एस-२० रु.५६,१०० - १,७७,५०० या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | सध्याचे नियुक्तीचे ठिकाण | पदोन्नतीचे पदनाम व पदोन्नतीवरील नवीन नेमणुकीचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. विजयकुमार मारुती माने, शादप | गुअवि मुंबई | गुअवि छत्रपती संभाजीनगर | रिक्त असलेल्या पदावर |

२. उपरोक्त प्रमाणे देण्यात आलेली पदोन्नती ही महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७ मे २०२१ मधील तरतुदीप्रमाणे सेवाज्येष्ठतेनुसार व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधिन राहून तसेच रिक्त पदांचा व प्रशासकीय कामकाजाचा आढावा घेऊन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहेत.

३. उपरोक्त प्रमाणे पदोन्नत झालेल्या हस्ताक्षर तज्ञ यांनी त्यांचेकडील सर्व प्रलंबित संदर्भ आवश्यक त्या सर्व कागदपत्र व शासकीय वस्तुंच्या यादीसह पदमोचक हस्ताक्षर तज्ञांकडे किंवा संबधित पर्यवेक्षीय अधिकारी यांचेकडे न चुकता दयावी. त्याशिवाय त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त होता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

४. उपरोक्त पदोन्नत हस्ताक्षर तज्ञ यांना शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पीएचवाय/१०८२/सीआर/११००(२)/ एसईआर-३, दिनांक ०६.११.१९८४ नुसार पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत विकल्प देणे बंधनकारक राहील व अशा प्रकारचा विकल्प न देणाऱ्या हस्ताक्षर तज्ञांचे पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम ११ (१)(अ) नुसार करण्यात येईल.

**"पदोन्नती मिळालेल्या हस्ताक्षर तज्ञांना शुभेच्छा"**

(सुनिल रामानंद)
अपर पोलीस महासंचालक
गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे

प्रति,

श्री.विजयकुमार मारुती माने, शादप, नेमणूक गुअवि मुंबई

मार्फत व प्रत,

अति.मुख्य शासकीय दस्तऐवज परिक्षक, गुअवि, मुंबई

२/- वर नमुद हस्ताक्षर तज्ञ यांचे विरुध्द प्राथमिक /विभागीय चौकशी चालु अथवा प्रस्तावित असेल त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करण्यात येवू नये व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३/- वर नमुद हस्ताक्षर मुद्रा तज्ञ यांना पदोन्नती नाकारावयाची असल्यास त्यांचेकडून तसा लेखी अहवाल सात दिवसाच्या आत घेऊन तसे या कार्यालयास सादर करावा. पदोन्नती नाकारल्यास त्यांची कालबध्द पदोन्नती काढून घेण्यात येईल.

४/- संबधित पदोन्नत झालेल्या तज्ञांस उक्त आदेशातील परि.क्र.३ मधील नमुद बाबींची पुर्तता करुनच बदली हस्ताक्षर तज्ञ हजर होण्याची प्रतीक्षा न करता पदोन्नतीवर नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्याकरिता त्यांच्या कार्यालयातून तात्काळ कार्यमुक्त करुन तसे या कार्यालयास कळवावे.

प्रत,

विशेष पोलीस महानिरीक्षक, रागुअवें, गुअवि, म. राज्य, पुणे
मुख्य शासकीय दस्तऐवज परिक्षक, गुअवि पुणे
अति. मुख्य शासकीय दस्तऐवज परिक्षक, गुअवि छत्रपती संभाजी नगर .
पोलीस अधीक्षक, तांत्रिक सेवा, गुअवि, पुणे
गोपनीय शाखा, गु.अ.वि., म.राज्य, पुणे.

२/- गोपनीय अहवालासंबधी पुढील कार्यवाहीस्तव.